CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol I , 20th March 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# १२. गोखले शिक्षण संस्थेची वाटचाल

सौ.मृण्मयी मनोज भुसाणे
*सहाय्यक प्राध्यापक,गोखले एज्युकेशन सोसायटी, कला ,वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, श्रीवर्धन जि.रायगड*

---

" गुरुने दिला ज्ञानरुपी वसा
आम्ही चालवु हा पुढे वारसा"

ज्ञानाचा सागर म्हणजे गोखले कॉलेज विश्वरुपी महाविद्यालय म्हणजे गोखले कॉलेज आमच्या श्रीवर्धनची शान म्हणजे गोखले कॉलेज आणि आमच्या महाविद्यालयाची शान म्हणजे आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.आर.मेश्राम सर रायगड जिल्हयातील श्रीवर्धन हा तालुका गर्द हिरव्या झाडीने नटलेला कोंकण आहे. या श्रीवर्धन शहराची लोकसंख्या १५००० च्या आसपास आहे. श्रीवर्धन हे एक पर्यटनस्थळ म्हणून नावारुपाला आलेले शहर आहे. कारण या श्रीवर्धनमध्ये सर्वांना हवाहवासा वाटणारा स्वच्छ व सुंदर असा समुद्र किनारा आहे. खुप दुरवरुन पर्यटक याठिकाणी आनंद लुटण्यासाठी येतात. त्याचबरोबर या श्रीवर्धनमध्ये श्री. सोमजाई देवीचे मंदिर प्रसिध्द आहे. हे मंदिर पुरातन असूनदेखील ते भक्तांना पावणारे मंदिर आहे. अनेक ठिकाणच्या व्यक्ती या सोमजाई देवीचे दर्शन घेण्यासाठी याठिकाणी येतात. तसेच दिवेआगर याठिकाणी सोन्याचा गणपती सापडला म्हणून तेथे श्री गणपतीच्या मुर्तीची स्थापना करुन मंदिर उभारण्यात आले. श्री. गणपतीचे हे मंदिर खुप प्रसिध्द आहे. दक्षिण काशी असा उल्लेख केलेल्या हिरेश्वर येथे श्री. कालभैरवांच मंदिर असुन त्याला लागुनच स्वच्छ व सुंदर असा समुद्र किनारा आहे. याठिकाणी देखील पर्यटक खुप दुरवरुन येतात. या श्रीवर्धन मध्ये विविध सण– उत्सवदेखील साजरे केले जातात. म्हणुन श्रीवर्धन हे शहर खुप प्रसिध्द आहे.

विविधतेने नटलेल्या अशा या श्रीवर्धनमध्ये गोखले शिक्षण संस्था नाशिक यांनी आपले लक्ष वळविले खरं तर गोखले शिक्षण संस्थेची स्थापना नाशिक येथे सन १९१८ मध्ये झाली. नामदार गोपाळकृष्ण गोखले यांची प्रेरणा घेऊन प्रिन्सिपल टी.ए. कुलकर्णी यांनी नाशिक येथे गोखले शिक्षण संस्थेची स्थापना केली मा. प्राचार्य एस.बी. पंडीत सर हे गोखले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असुन त्यांचे व्यक्तिमत्व हे गोखले शिक्षण संस्थेला साजेल असेच दयावंत,कृपावंत आणि निष्ठावंत आहे. मा. प्राचार्य डॉ.मो.स.गोसावी सर हे गोखले शिक्षण संस्थेचे सचिव आहेत. मा. प्राचार्य डॉ. मो.स. गोसावी सर हे शिक्षण क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्व असुन वयाच्या २३ व्या वर्षी (१९५८) नाशिक येथील बी.वाय.के. वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची धुरा खांदयावर घेऊन ती सतात ३४ वर्षे सांभाळुन सर्वात तरुण वयात प्राचार्य व प्रदीर्घ काल प्राचार्य ,असा त्यांनी जागतिक विक्रम केला आहे. प्राथमिक, माध्यमिक, शालान्त पीरक्षा तसेच महाविद्यालयीन व विद्यापीठीय सर्व परीक्षांमध्ये त्यांनी प्रथम श्रेणीत पहिला क्रमांक पटकावला भारतातील 'मॅनेजमेंट सायन्स'या विद्याशाखेचे ते देशतील पहिले पी.एच.डी. आहेत. ते साहितयाचार्य (मराठी), साहित्यरत्न (हिंदी),पंडित (संस्कृत) व जर्मनभाषा पारंगत आहेत. आपल्या दीर्घ परिश्रमाने व द्रष्टेपणामुळे गोखले शिक्षण संस्थचे बी.वाय.के.कॉमर्स कॉलेज (१९५८–१९९५) या काळात त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवले आहे. आज देशातील ३५हजार कला

Copyright by © Shaurya Publication, Latur / Email- hitechresearch11@gmail.com / www.rjournals.co.in

Arts Commerce ... College Shrivardhan



/वाणिज्य/ विज्ञान महाविद्यालयांपैकी हे एकमेव महाविद्यालय की ज्यास २०१० मध्ये 'अ' वर्ग दिला आहे. तसेच आय.एस. ओ. ९००१–२००८ हे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र ही या महाविद्यालयास व संस्थेस प्राप्त झाले आहे. १९९२ मध्ये नेदरलॅड येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत उच्च शिक्षणाला नवी दिशा देणारे व महाविद्यालयीन शिक्षणास उद्योजकतेकडे नेणारे महाविद्यालय म्हणुन जागतिक प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्याचे संपुर्ण श्रेय त्यांना व त्यांचे सर्व सहकारी यांनाच जाते. द्रष्टेपणा, धडाडी व चिकाटी दाखवुन त्यांनी विद्यापीठीय विशेषत: वाणिज्य विद्या शाखेत सर्व स्तरावरील शिक्षण, संजीवक, परिणामकारक व प्रवाही करण्याचा आदर्श वस्तुपाठ देशामध्ये अभा केला असुन संशोधनाच्या क्षेत्रातही त्यांनी भरीव कामगिरी केली आहे.

गोसावी सरांचे व्यक्तिमत्व विविध पैलुंनी नटले आहे. ते उत्कृष्ट वक्त, व्यासंगी–प्राध्यापक,कुशल प्राचार्य, नेतृत्वसंपन्न संघटक व थोर व्यवस्थापन तज्ञ म्हणुन मशहुर आहेत. भारतातील विद्यापीठीय व्यवस्थापन विद्या अभ्यासक्रमाचे (एम.बी.ए.) ते आद्य प्रवर्तक असून या विषयातील पी.एच.डी.चे पहिले मार्गदर्शक संशोधक आहेत.

गोखले शिक्षण संस्थेचे ते १९६० पासुन आजीव सदस्य असून जानेवारी १९७३ पासून गेली ४० हुन अधिक वर्षे ते संस्थेचे सरचिटणीस म्हणून दर तीन वर्षांनी एकमताने सातत्याने निवडुन आले आहेत. आज या संस्थेत ३ विभागीतील १७ शाखांमधुन एक लाखाहुन अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जात आहे. गोखले शिक्षण संस्था ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील दर्जेदार व नेतृत्व प्रशिक्षण देणारी महत्वपुर्ण संस्था म्हणुन ख्यातकीर्त करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. जगातील निरनिराळया देशांना युरोप , अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका ,मध्यपुर्व आशिया देशांना व त्यातील विद्यापीठांना त्यांनी भेटी दिल्या असुन अनेक राष्ट्रीय ,आंतरराष्ट्रीय व जागतिक परिषदेत अध्यक्ष /प्रवक्ते तसेच उद्घाटक म्हणुन सहभाग दिला आहे.

गोखले शिक्षण संस्था नाशिक यांनी आपले लक्ष श्रीवर्धनकडे वळविले श्रीवर्धनमध्ये गोखले शिक्षण संस्था स्थापन करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे जुन १९९८ साली एस.टी.स्टॅडच्या समोर असलेल्या एका इमारतीमध्ये गोखले शिक्षण संस्थेने वरिष्ठ महाविद्यालयाचे पहिले वर्ष सुरु केले. गोखले शिक्षण संस्थेने सुरु केलेल्या या महाविद्यालयाचे उद्घाटन मा. डॉ.मो.स.गोसावी गोखले शिक्षण संस्थेचे सचिव यांनी केले. त्यावेळी महाविद्यालयात प्राचार्यांसाठी स्वतंत्र ऑफिस होते. तसेच शिक्षकांसाठी शिक्षकवृंद कक्ष होते. तसेच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र यांची प्रयोगशाळी होती. त्यावेळी ग्रंथालयदेखील होते परंतु स्वतंत्र ग्रंथपाल कोणीच नव्हता. १९९८ साली वरिष्ठ महाविद्यालयामध्ये चार महिने रोकडे सर हे प्राचार्य होते. तर त्या पुढील महिन्यापसुन श्री. एस.एस.गोसावी सर हे प्राचार्य होते.

१९९८ ते १९९९ साली वरिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या १०५ होती. त्यावेळी कनिष्ठ महाविद्यालय सुरु झाले नव्हते तर जुन १९९९ ते २००० या वर्षी कनिष्ठ महाविद्यालयाची अकरावी सायन्स ची शाखा सुरु करण्यात आली. परंतु त्यावर्षी वाणिज्य व विज्ञान या दोन्ही शाखा सुरु झाल्या. त्यावर्षी कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या ३६ होती – तर वरिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या १९९९–२००० या वर्षी १६७ होती. २००१ ते २००२ यावर्षी वरिष्ठ महाविद्यालयाची विदयार्थी संख्या २७९ होती तर कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या ८२ होती अशा रितीने वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाची विदयार्थी संख्या दरवर्षी वाढतच गेली.

Arts Commerce & Science College Shreewardhan



गोखले शिक्षण संस्थेमध्ये शिकत असलेल्या विदयार्थाची संख्या वाढत असल्यामुळे विदयार्थाना बसण्यासाठी जागा अपुरी पडु लागली. त्यामुळे गोखले शिक्षण संस्थेला स्वतःची जागा घेऊन त्या जागेमध्ये स्वतःची इमारत बांधणे गरजेचे वाटु लागले. जागा शोधण्यात त्यांना यश आले आणि गोखले शिक्षण संस्थेने आराठी पेट्रोल पंपाजवळ उंच टेकडीवर पाच एकर विस्तीर्ण जागा घेतली त्या जागेमध्ये गोखले शिक्षण संस्थेने स्वतःची सर्व सोईनी सुसज्य अशी भव्य दिव्य इमारत २००२ या वर्षी उभी केली. या नवीन भव्यदिव्य इमारतीचे उद्‌घाटन २२/०३/२००३ साली त्यावेळचे लोकसभेचे सन्माननीय सभापती मा.श्री. मनोहरपंत जोशी यांच्या हस्ते संपन्न झाले. गोखले शिक्षण संस्थेच्या या भव्यदिव इमारतीमध्ये पुढील महाविद्यालयीन शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली वरिष्ठ महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य व विज्ञान तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या वाणिज्य व विज्ञान इ.शाखा कार्यरत आहेत. प्राचार्यासाठी, उपप्राचार्यासाठी स्वंतत्र कार्यालय आहे. इतर कर्मचा–यांसाठी देखील कार्याल उपलब्ध आहेत. ग्रंथालय असून स्वतंत्रपणे ग्रंथपाल नेमलले आहेत. शिक्षक वृंद कक्ष आहे. भौतिक, रसायन, वनस्पतीशास्त्र यांच्या प्रयोगाशाळा आहेत. संगणक कक्ष आहे. महिला कक्ष व विदयार्थी कक्ष आहेत. विदयार्थ्यांसाठी मोठ.मोठया वर्गखोल्या आहेत. जिमखाना विभाग आहे. इ. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रत्येक विषयांसाठी स्वतंत्र शिक्षक नेमलेले आहेत. सर्व सोयी –सुविधांनी सुसज्ज असे आमचे महाविद्यालय आहे.

हे महाविद्यालय विद्यापीठाशी कायम स्वरुपी संलग्न झाल्यानंतर (पर्मनंट ॲफीलिएशन लेटर मिळाल्यानंतर ) २ एफ १२ बी अंतर्गत यु.जी.सी. (विद्यापीठ अनुदान महामंडळ) मध्ये रजिस्ट्रेशन करावे लागते. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर महाविद्यालयाला यु.जी.सी. वेगवेगळया योजनेवर अनुदान देत असते. आपल्या महाविद्यालयाला या योजनेअंतर्गत २००९ –१० पासून आजपर्यंत वेगवगळया सदर योजनेत उदा. युवा महाविद्यालय अनुदान मागसलेल्या भागासाठी अनुदान महाविद्यालय अनुदान प्राप्त झाले असुन त्याचा फायदा महाविद्यालयाला झाला . या योजनेअंतर्गत महाविद्यालयाने वेगवेगळे उपक्रम राबवलेले आहेत. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने मर्जस्किम अंतर्गत महाविद्यालयाला वेगवेगळी अनुदाने दिलेली आहेत. त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोगाने शिक्षकांसाठी लघु संशोधन प्रकल्पाअंतर्गत ६ सहाय्यक प्राध्यापकांना अनुदान मिळवून दिलेले आहे. त्यानुसार त्यांनी ते पुर्ण केलेले आहे. त्याचबरोबर कॉलेज विकासासाठी ग्रॅट मिळालेली आहे.

म्हाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग अत्यंत महत्वाचा आहे. सन १९९८ मध्ये ४५७ पुस्तकांच्या संख्येने सुरुवात झालेल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये आजपवेतो ७०४७ पुस्तके आहेत. सदर महाविद्यालयाचे ग्रंथालय सर्व सोयींनी समृध्द अदयावत तसेच संपूर्ण संगणकीकृत आहे. तसेच ग्रंथालयामध्ये इंटरनेटची सुविधा सर्व शिक्षक व विदयार्थ्यांना शैक्षणिक कार्यासाठी पुरविली जाते. सन २०१०–११ पासून ग्रंथालयामध्ये इनाफिबनेट एन लिस्ट प्रकल्पाअंतर्गत विविध विषयांची २१०० पेक्षा जास्त इ–जर्नल्स आणि ५१००० हजार पेक्षा जास्त इ–पुस्तके डिजिटल ग्रंथालयाच्या स्वरुपात उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांच्या प्रकल्पासाठी तसेच शिक्षकांच्या संशोधनासाठी उपयोग होतो. विदयार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढावी म्हणुन ग्रंथालयामध्ये वाचक मंचाची स्थापना करण्यात आलेली आहे. महाविद्यालयीन ग्रंथालय हे पुढील ४ विभागत विभागले आहे. विदयार्थी अभ्यास कक्ष (अभ्यासिका), क्रमिक पुस्तके कक्ष, संदर्भग्रंथ कक्ष व इंटरनेट कक्ष.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

**Special Issue** | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue I Vol I , 20th March 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

विदयार्थ्यातील गुण वृद्धींगत करण्यासाठी व त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक विभाग महाविद्यालयामध्ये कार्यरत आहे. विभागाच्या माध्यमातुन दरवर्षी विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या जातात. राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती, शिक्षक दिन, गुरुपोर्णिमा ,मराठी भाषा दिन, यासारखे दिवसही विविध स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करुन साजरे केले जातात. महाविद्यालयीन स्तरावरील स्पर्धामध्ये विदयार्थी यश संपादन करत असतात तसेच आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धामध्ये विदयार्थांना भाग घेण्यास प्रवृत्त केले जाते. त्याकरीता त्यांना विभाग योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य करते. आंतर महाविद्यालयीन स्तरांवरील सांस्कृतिक स्पर्धामध्येही विदयार्थी यशस्वी होत आहेत. विभागामार्फत सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धामध्येही विदयार्थी सहभागी होतात. त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते. विशेष म्हणजे महाविद्यालयाने ४२ व्या युवा महोत्सवात आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धाचे यशस्वी आयोजन विदयार्थी कल्याण विभाग मुंबई विद्यापीठ यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

गोखले शिक्षण संस्थेच्या वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनींकरिता महिला विकास मंचाव्दारे अनेक कार्यक्रम आयोजित केले जात असतात. गेल्या १० वर्षापासून महाविद्यालयातील विद्यार्थीनींना आरोग्यविषयक जाणिव निर्माण करुन देण्यासाठी विविध क्षेत्रातील पाहुणे, डॉक्टर आणि काही सेवाभावी संस्थामधील नामवंत लोकांना बोलावून मुलीच्या आरोग्यविषयक समस्यांचे समाधान केले जाते. 'सखी तुझ्यासाठी', 'तणाव व्यवस्थापन' तसेच ३३% स्त्रियांकरिता असणारे आरक्षण' इ. माध्यमातून मुलींच्या सामाजिक प्रश्नांचीदेखील उत्तरे देण्याचा प्रयत्न महिला विकास मंचाव्दारे केला जातो.

जिमखाना विभाग म्हणजे महाविद्यालयाचा महत्वाचा विभाग. या विभागामार्फतच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी आपल्या विविध खेळांचे प्रदर्शन करत असतात. खेळल्यामुळे आपला शारिरीक व्यायाम होतो आणि आपली मानसिक विकासदेखील होतो. दरवर्षी आमच्या कॉलेजमध्ये सर्व प्रकारचे खेळ खेळले जातात. वेगवेगळया क्रिडास्पर्धेत विद्यार्थी भाग घेतात व यशस्वीही होतात. आमच्या महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थांना खेळासाठी राज्यस्तरावर पाठविले जाते. तसेच परीक्षा विभाग हा देखील अत्यंत महत्वाचा विभाग आहे. दरवर्षी आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी उत्तमरित्या नंबर काढून यशस्वी होतात. आणि आमच्या महाविद्यालयाचे नाव मोठे करतात.

त्याचबरोबर आमच्या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यरत आहे. दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर सात दिवसांसाठी एखाद्या गावामध्ये घेतले जाते. त्या सात दिवसांच्या कालावधीमध्ये वेगवेगळे कार्यक्रम, व्याख्याने घेतली जातात. अशा रितीने गोखले कॉलेज हे आमचे सर्वोत्कृष्ट कॉलेज आहे.

गोखले शिक्षण संस्था ही सर्वात नावाजलेली शिक्षण संस्था असून मी या शिक्षण संस्थेमध्ये शिकविण्याचे काम करते. गोखले शिक्षण संस्थेमुळे मला खूप काही शिकायला मिळाले त्यासाठी मी स्वत:ला भाग्यवान समजते.

"स्वर्गाहुनी सुंदर असते गोखले कॉलेज
मनाहून मोठे असते गोखले कॉलेज."

धन्यवाद !